VOL- VIII ISSUE- III MARCH 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# नांदेड विभागातील मुक्त विद्यापीठांतर्गत दिल्या जाणाऱ्या दुरस्थ शिक्षणातील बीए बीकॉम विद्यार्थ्यांना अध्ययनात येणाऱ्या अडचणी चा विश्लेषणात्मक अभ्यास

संशोधक
**गोविंद टोपाजी कु-हे**
एम.ए.एम.एड.एम.फिल

**प्रस्तावना**

आजच्या औपचारीक शिक्षण व्यवस्थेबद्दल जवळपास सर्वजण असमाधानी आहेत. कारण ही शिक्षण व्यवस्था केवळ परीक्षा वर आधारित आहे .चार भिंतीच्या आत ती अडकली आहे .दररोज वर्गात जाऊन शिक्षण घेणे शक्य नाही .अशा लोकांसाठी ही शिक्षणव्यवस्था न्याय देऊ शकत नाही .त्यामुळे ओपचारिक शिक्षण हे निरर्थक बनत चालले आहे या औपचारिक शिक्षण व्यवस्थेला पर्यायी व्यवस्था म्हणून सहशिक्षण, अनौपचारिक शिक्षण, दूरस्थ शिक्षण ,मुक्त शिक्षण यांचा विचार केला जातो. यापैकी दुरुस्थ शिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा विचार आहे .या प्रणालीचा अवलंब मुक्त विद्यापीठाने केला आहे.

दुरस्थ शिक्षणामुळे कर्मचारी, कामगार ,मजूर, शेतकरी ,महिला आणि इतर घटक शिक्षणापासून वंचित आहेत त्यांना शिक्षणाची संधी मिळते .आज पत्रव्यवहाराच्या माध्यमातून मुक्त विद्यापीठांतर्गत असेल विविध प्रसार माध्यमाद्वारे हे शिक्षण दिले जाते यातून शैक्षणिक समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नही केले जातात . दुरस्थ शिक्षण प्रणालीतील अध्ययनार्थी आणि अध्यापक हे परस्परांपासून दूर असतात. त्यामुळे अध्ययनार्थी आणि अध्यापक यांच्यातील आंतरक्रिया आणि संप्रेषण आचा वेग मंद असतो. या कारणामुळे विद्यार्थ्यांना अध्ययनात मध्ये अनेक अडचणी येत असतात. यात चींतना मधून संशोधकांनी दुरस्थ शिक्षणातील अध्ययन कर्त्याला अध्ययनात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास हा संशोधन विषय निश्चित केला आहे .

मुक्त विद्यापीठांतर्गत चालत असलेलं दूरस्थ शिक्षण अध्ययन आर्तीला अध्ययनासाठी कोणते प्रयत्न करते कोणत्या सुविधा पुरवते तसेच अध्ययन करताना कोणत्या बाबी अडथळा ठरतात. अशा अनेक प्रश्नांचा अभ्यास या संशोधन कार्यामध्ये संशोधकाने केला आहे .मुक्त विद्यापीठांतर्गत दिल्या जाणाऱ्या या शिक्षणातील विद्यार्थ्यांना अध्ययनात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे व त्यावर उपाय सुचवणे हा संशोधनाचा उद्देश आहे.

**संशोधन समस्येची उद्दिष्टे**

१. दुरुस्त शिक्षणातील येणाऱ्या अध्ययन अडचणींचा अभ्यास करणे
२. मुक्त विद्यापीठातील दुरुस्त शिक्षणाचे स्वरूप अभ्यासणे
३. दुरुस्त शिक्षण प्रणालीचा समीक्षात्मक अभ्यास करणे
४. औपचारिक शिक्षण देणाऱ्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा अध्ययन व दूरस्थ शिक्षण देणाऱ्या मुक्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा

अध्ययन यांचा तुलनात्मक दृष्ट्या अभ्यास करणे

**परिकल्पना -**

१.दूरस्थ शिक्षण प्रणालीच्या स्वरूपाचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर प्रतिकूल परिणाम होतो

२.औपचारिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अध्ययन हे मुक्त विद्यापीठातून दुरुस्त शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा अध्ययन या पेक्षा श्रेष्ठ आहे

३.दूरस्थ शिक्षण प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनात मदत होते

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत समस्याही वर्तमानकालीन आहे त्यामुळे संशोधकांनी आपल्या संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीची निवड केली आहे यानुसार मुक्त विद्यापीठांतर्गत दुरुस्त शिक्षण प्रणालीतील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे जाऊन प्रश्न विचारून सर्वेक्षण करावे लागणार आहे व त्यांच्या अडचणी जाणून घेता येईल

**व्याप्ती व मर्यादा -**

हे संशोधन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत चालत असलेल्या नांदेड विभागा पुरते मर्यादित आहे या विभागात नांदेड परभणी हिंगोली लातूर या चार जिल्ह्यांचा समावेश आहे .या विभागाअंतर्गत दुरुस्त शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचार यात केला आहे .तसेच संशोधनावर वेळ, काळ यांची ही मर्यादा पडली आहे .

**संशोधनाचे साधन -**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी निष्कर्ष काढण्यासाठी प्रश्नावली या साधनांचा उपयोग केला आहे

**नमुना निवड -**

नमुना निवड पद्धतीचे दोन प्रकार पडतात संभाव्य नमुना निवड आणि असंभाव्य नमुना निवड प्रस्तुत संशोधनासाठी असंभाव्य नमुना निवडीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे

निष्कर्ष -

१. नांदेड विभागातील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या स्वामी रामानंद तीर्थ अध्यापक महाविद्यालय कंधार या अभ्यास केंद्रावर मुक्त विद्यापीठाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार तासिका नेहमी होतात .

२. मुक्त विद्यापीठात दुरुस्त शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या शिक्षकांची असलेला संपर्क अधिक जवळचा आहे

३. दुरुस्त शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्यापकांनी शिकलेला प्रत्येक पाठवून चांगल्याप्रकारे समजतो

४. दुरुस्त शिक्षण प्रणालीतील अध्यापक त्यांच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी दूर करण्यास नेहमी तत्पर असतात

५. या केंद्रावरील तासिका वेळापत्रकानुसार ज्या शिक्षकांच्या आहेत तेच शिक्षक त्या तासिका घेतात

६. मुक्त विद्यापीठ अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षण घेण्यास आवडते म्हणजे ते मुक्त विद्यापीठातील दुरुस्त शिक्षण प्रणालीवर नाखूष आहेत .

७. बहुतांशी विद्यार्थ्यांना सुलभ अभ्यासक्रम असल्यामुळे औपचारिक शिक्षणापेक्षा मुक्त विद्यापीठातील शिक्षण सोयीस्कर वाटते

१०.निम्म्या विद्यार्थ्यांच्या मते प्रभावी अध्ययनासाठी त्यांच्या विद्यापीठाकडून घेतल्या जाणाऱ्या तासिका पुरेशा आहेत

११.अर्ध्यापेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा त्यांच्या अध्यापकाची आवश्यक त्या वेळेला संपर्क होतो

१२.दूरस्थ शिक्षण प्रणालीत प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन कौशल्य विकास करण्याचा प्रयत्न केला जातो

१३.मुक्त विद्यापीठात अध्यापनासाठी अध्यापक वेगवेगळी शैक्षणिक साधने तंत्रज्ञानाचा उपकरणाचा उपयोग करतात

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. पवार ना ग - भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह
2. पारसनीस न रा - शिक्षकांचे प्रशिक्षण
3. पेठे मधुकर - भारतीय शिक्षण
4. भिंताडे वि रा - शैक्षणिक संशोधन पद्धती
5. पंडित ब बी - शिक्षणातील संशोधन
6. नागतोडे किरण - शालेय व्यवस्थापन शैक्षणिक संरचना
7. देशपांडे प्रकाश - अनुदेशन प्रणाली अभिकल्प
8. कदम पी ए - उद्यौन मूक भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक